*Annexure XVII (5), (Vide Article - 17.04)*

(4)

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966
च्या कलम 44 अन्वये कोळसा भट्टया
लावण्यासाठी बिनशेती वापराच्या
परवानगी बाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.एनएपी 1087/16203/सीआर 1128/ल-2,
मंत्रलय, मुंबई 400 032.
दिनांक 19 फेब्रुवारी, 1992.

वाचा :- शासन निर्णय आदेश क्र. सम दिनांक 11 मे, 1987.

शासन निर्णय :-

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एनएपी 1087/16203/सीआर 1128/ल-2, दिनांक 11 मे 1987 च्या आदेशानुसार अवैध वृक्षतोडीला आवर घालण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत कोळसा भट्टयासाठी जमिनीचा तात्पुरता अकृषिक वापर करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 खालील परवानगी देण्यात येवू नये असे आदे देण्यात आले होते.

2. उपरोक्त आदेशाचे पुनरिक्षण करुन समकमांकाचे दिनांक 11 मे 1987 चे आदे आता रद्द करण्यात येत असून त्याऐवजी पुढील सुधारित आदेश शासन देत आहे. कोळसा भट्टयांसाठी अकृषिक परवनगी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिती 1966 च्या कलम 44 व महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, 1969 च्या तरतूदींना अधिन राहून खालील अटींवर देण्यात यावा.

1. कोळसा भट्टयांसाठी वनखात्याचे " ना हरकत प्रमाणपत्र' घेण्यात यावे.
2. कोळसा भट्टयांची जागा संरक्षित वा राखीव वनाच्या हद्दीपासून किमान 10 कि.मी. अंतरावर असावी.
3. कोळशाची वाहतुक पावसाळयात करण्यात येवू नये.
4. अकृषिक परवान्याचा काळ एक वर्षासाठी मर्यादित ठेवावा.
5. आरागिरण्यांप्रमाणेच कोळसा भट्टयांसाठी वन विभागाचा परवाना घेण्यात यावा.
6. जमीन मालकांनी जितकी झाडे तोडण्यात आली असतील त्याच्या दुप्पट झाडे लावली पाहिजेत.
7. कोळसा भट्टयांची जागा पर्यावरणाच्या दृष्टीने जो परिसर संवेदनशील वा अतिसंवेदनशील असेल अशा ठिकाणापासून किमान 25 कि.मी. अंतरावर असणे आवश्यक आहे.

अकृषिक परवानगी देताना जंगलावर अनिष्ट परिणाम होणार नाही याची वनसंरक्षक / जिल्हाधिकारी यांनी वनखात्याच्या सल्ल्याने उचित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा/-
(भा.सु.तायडे)
अतिरिक्त कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.